



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २६ जून १९४६ अंक २६



## —: साठे बिस्किटें :—


श्रुसबरी, ऑरेंज, फॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेटस

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी



## सारस्वत
## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ २८–५–१९४६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,४१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १,८१,००० |
| ठेवी | ... | रु. ६१,४१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ६७,५०,००० |

नवीन योजना—"विम्याचे हप्ते, कॉलेज फी, हॉस्पिटल खर्च, कपडा, प्रवास खर्च वगैरे गरजांची खर्चविभागणी सुलभ रीतीनें करतां यावी, यासाठी ही योजना आहे. या योजनेनुसार दर महिना ५ ते २५ रु. पर्यंत बचत करून २ टक्के व्याज मिळवितां येतें."

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा –

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## विविध माहिती

**बक्षिसाचे बॉंड्सः**—हिंदुस्थान सरकारच्या बक्षिसाच्या बॉंड्सच्या चिठ्या १५ जुलै रोजीं मुंबई येथें काढण्यांत येतील.

**मराठा चेंबरचे नवे अध्यक्षः**—मराठा चेंबरची वार्षिक सभा रविवार, ता. २३ रोजीं भरली होती, तीमध्यें किर्लोस्कर बंधु लि. चे श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांची येत्या वर्षाचे अध्यक्षस्थानीं निवड झाली.

**श्री. शंतनुराव किर्लोस्करः**—बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे डायरेक्टर बोर्डावरील आपल्या जागेचा श्री. आबासाहेब रानडे ह्यांनीं राजीनामा दिला. त्यांचे जागीं किर्लोस्कर बंधु लि. चे श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांस घेण्यांत आलें आहे.

**युद्धकाळांत मृत्यूंचें प्रमाण उतरलें:**—शांततेच्या काळापेक्षां युद्धकाळांत अमेरिकनांचा जीव अधिक सुरक्षित होता! लक्षावधि लोक लढाईवर गेले, तरी त्यामुळें मोटारीखालीं, कारखान्यांत किंवा घरांत अपघाती मृत्यू येण्याचा संभव कमी झाला. शांतताकाळापेक्षां १९४२–४५ ह्या मुदतींत मृत्यूचें प्रमाण उतरलें, असें तेथील विमा कंपन्यांचे आंकडे सांगतात.

**प्रां. स. इन्स्टिट्यूटची "को. डिप्लोमा परीक्षा":**—एप्रिल, १९४६ मध्यें पुणें व मुंबई येथें घेण्यांत आलेल्या परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणें आहेः—मुंबई केंद्र–दुसरा वर्गः (१) कुलकर्णी ग. य., पासः (१) कळंकर गो. रा. व मेहता सु. चं. पुणें केंद्र–पाहिला वर्गः (१) मेहता घ. भो. दुसरा वर्गः (१) नारायण ह. घु., (२) साळुंखे अ. ज्ञा., (३) कुलकर्णी र. का., (४) काळे य. वा., (५) कुलकर्णी म. के. पासः (१) भागवत द. पं. व (२) मोकाशी म. गो.

**वाई अर्बन बँकेची ज्युबिलीः**—वाई अर्बन को. बँकेची रौप्य ज्युबिली नुकतीच अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी झाली. सहकारी संघटनेनें शेतीची सुधारणा घडवून आणणें आणि शेतीशीं संलग्न अशा ग्रामोद्योगांस चालना देणें ह्यांचें महत्त्व अध्यक्षांनीं प्रतिपादन केलें.

**रेल्वे संप रद्द झालाः**—रेल्वेमेन्स फेडरेशनच्या मागण्यांसंबंधीं रेल्वे बोर्डानें दिलेलीं आश्वासनें विचारांत घेऊन, फेडरेशननें २७ जूनचा रेल्वे संप रद्द केला आहे.

**बँकेच्या राष्ट्रीयकरणाचा फायदाः**—बँक ऑफ इंग्लंड सरकारी मालकीची झाली, त्याचे फायदे वर्णन करतांना ब्रिटिश फडणवीस डॉ. डाल्टन हे म्हणाले, "ह्यापुढें, कर्जें उभारतांना नफ्याची अपेक्षा किंवा कंपनीवाल्यांचें हित हीं लक्ष्यांत आणलीं जाणार नाहींत. राष्ट्रीय हितासच प्राधान्य मिळेल. मजूर मंत्रिमंडळ अधिकारावर येण्यापूर्वीं दीर्घकालीन व अल्पकालीन व्याजाचे दर अनुक्रमें ३% व १% होते. ते आम्हीं आतां २½% व ½% वर उतरविले आहेत."

**नवें रेडिओ स्टेशनः**—नोवा गोवा येथें ता. १६ जूनपासून रेडिओ स्टेशन सुरू झालें. त्याची वेव्ह लेंग्थ ३३.४ मीटर्स आहे.

**श्री. पु. ग. मराठेः**—मुंबई येथील "असोसिएशन ऑफ इन्डस्ट्रीज" ह्या संस्थेच्या सेक्रेटरीचे जागीं श्री. पु. ग. मराठे ह्यांची निवड झाली आहे. श्री. एल. सी. जरीवाला हे अध्यक्ष झाले आहेत.

**भारत बँक लि.,**—तीन वर्षांपूर्वीं स्थापन झालेल्या ह्या बँकेचें खेळतें भांडवल आतां ३३ कोटि रुपये झालें आहे. रिझर्व्ह फंड ३० लाखांवर गेला आहे. ३१ मार्च १९४६ अखेर संपलेल्या वर्षी बँकेस २४ लाख रुपये नफा झाला.









पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,












# मुंबई सरकारच्या पुनर्घटनेच्या योजना

## ग्रामीण जीवनांत नवचैतन्य ओतण्याचा प्रयत्न

हिंदी राज्यघटनेच्या ९३ कलमाखालील गव्हर्नरांच्या सल्लागारांच्या कारभाराची इतिश्री होऊन प्रातिनिधिक स्वरूपाचें काँग्रेस-पक्षीय सरकार मुंबई प्रांतांत अधिकारावर आल्यापासून लोकांचे डोळे या सरकारच्या कारभाराकडे अपेक्षेनें पहात होते. युद्धकालीन परिस्थितीला कंटाळून गेलेल्या मुंबई-प्रांतांतील जनतेने काँग्रेस-मंत्रिमंडळाकडून लोककल्याणाच्या कार्यक्रमाची अपेक्षा करावी हें क्रमप्राप्तच होतें. तथापि काँग्रेस-मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यावर यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें सर्व प्रांतांत आबादी-आबाद नांदूं लागेल अशी भलतीच आशा उराशीं बाळगण्याने पदरीं निराशा येण्याचाच संभव अधिक हें प्रांतांतील प्रत्येक सुजाण व्यक्तीने सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे.

गेल्या आठवड्यांत काँग्रेस-मंत्रिमंडळाच्या युद्धोत्तर पुनर्घटनेसंबंधी एक पत्रक मुंबई सरकारच्या माहिती खात्याकडून प्रसिद्ध करण्यांत आलें असून पुनर्घटना खात्याचे मंत्री श्री. ल. मा. पाटील यांनी याच विषयासंबंधी एक मुलाखतही पत्रकारांना दिलेली आहे. माहिती खात्याचें प्रसिद्धिपत्रक व वृत्तपत्रकारांना श्री. पाटील यांनी दिलेली मुलाखत यावरून हातीं असलेल्या सत्तेचा उपयोग करून मुंबई प्रांतांतील सामान्य लोकांची जीवनाची परिस्थिति अधिक सुसह्य करण्याचा सरकारचा इरादा स्पष्ट होत आहे. हिंदुस्थानांतील सुमारें ७ लाख खेड्यांपैकीं २२ हजार खेडीं मुंबई प्रांतांत असून, या खेड्यांतून रहाणाऱ्या जनतेच्या तांतडीच्या प्रश्नांकडे प्रथम लक्ष पुरविण्याचें मंत्रिमंडळाने ठरविलें आहे. मुंबई प्रांत हा अन्नधान्याच्या दृष्टीने तुटीचा प्रांत आहे ही गोष्ट मशहूर आहे. तेव्हां आजच्या परिस्थितींत प्रांतांतील शेतकऱ्याला अधिक कार्यक्षम करणें असेल तर त्याच्या दैनंदिन आयुष्यांतील अडचणी प्रथम निवारण केल्या पाहिजेत हें उघडच आहे. पण प्रांताची आजची परिस्थिति बिकट असल्यामुळें काँग्रेस-मंत्रिमंडळ खेडेगांवांच्या पुनरुद्धाराकडे लक्ष पुरवीत आहे असा मात्र अर्थ नव्हे. काँग्रेस मंत्रिमंडळाचें हें धोरण काँग्रेससारख्या राष्ट्रीय संस्थेच्या राजकीय कार्यक्रमांतूनच जन्माला आलेलें आहे. हिंदुस्थानांत परकीय सरकारचा अंमल चालू झाल्यापासून कोणत्याही सुधारणेंत पुढाकार घ्यावयाचा तो सरकारने घेतला पाहिजे अशा प्रकारची कांहींशी विचित्र पण अनिर्वाह्य वृत्ति जनतेंत निर्माण झालेली होती व आहे. ही वृत्ति लक्षांत घेऊन सध्याच्या प्रातिनिधिक सरकारने ग्रामीण जीवनांत नवचैतन्य ओतण्याचें काम आपणाकडे घेतलें तें योग्यच आहे. परंतु कोणत्याही सरकारचा अखेरचा व बळकट पाया म्हणजे, तें सरकार ज्या लोकांवर राज्य करतें, ती जनता होय, हें तत्त्व लक्षांत ठेवून मुंबई-सरकारने जनतेच्या पुढाकारालाही आव्हान दिलेलें आहे. असा पुढाकार घेण्याची वृत्ति ज्या ठिकाणीं दिसून येईल, त्या त्या ठिकाणच्या प्रयत्नांना सरकार पैशाची मदत अधिक प्रमाणांत करणार आहे.

खेडेगांवांतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पिण्याच्या पाण्याचा होय. कांहीं कांहीं खेडेगांवांना केवळ पिण्याचें पाणी आणण्यासाठीं पांच पांच मैल दूर जावें लागतें. अशा खेडेगांवांतील पाण्याचें दुर्भिक्ष प्रथम दूर करण्याचें ठरलें आहे. याशिवाय खेड्यांतील अन्नाचा पुरवठा वाढवून तीं शक्य तों स्वयंपूर्ण करणें, मच्छीमारीच्या धंद्याची शास्त्रीय पुनर्रचना करणें, मेंढ्या पाळणें, कोंबडी पाळणें वगैरे धंद्यांनाही उत्तेजन देण्यांत येणार आहे. हिंदुस्थानांतील इतर शेतकऱ्यांप्रमाणें मुंबई प्रांतांतील शेतकरीहि जवळ जवळ सहा महिने निरुद्योगी असतो; म्हणजे काम करण्यास सवड व संधि असून निरुद्योगी असतो असें नव्हे; तर खेड्यांतील शेतीचा हंगाम संपल्यावर दुसरा उद्योगच तेथें मिळूं शकत नाहीं. ही परिस्थिति लक्षांत घेऊन शेतीचा हंगाम संपल्यावर ग्रामोद्योग व शेतकऱ्याचा रिकामा वेळ यांची सांगड घालून देण्यांत यावयाची आहे. एकंदरीने प्रांतांतील सर्व लोकांच्या-शहरांतील लोकांच्या सुद्धां-प्राथमिक गरजा भागविणें या एकमेव हेतूने प्रांताची पुनर्घटना करण्यांत येणार आहे. या प्राथमिक गरजांत पिण्याचें पाणी, अन्न, जळण, वस्त्र, रहाण्यासाठीं घरें, वैद्यकीय मदत आणि शिक्षण इतक्या गोष्टींचा समावेश करण्यांत आला आहे.

प्रांतांतील तांतडीच्या गरजा लक्षांत घेतां वरील कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आहे यांत शंका नाहीं. तथापि मुंबई प्रांताची भरभराट भरभक्कम व शास्त्रीय पायावर उभारावयाची असेल तर हा कार्यक्रम अपुरा पडणार आहे याची जाणीव मंत्रिमंडळाला पूर्णपणें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. प्रांतांतील मोठ्या प्रमाणावर चालणारे उद्योगधंदे आणि सार्वजनिक सोयींच्या संस्था यांच्यावर लोकहिताच्या दृष्टीने जरूर तें नियंत्रण ठेवण्याचा व प्रसंगीं त्यांचें राष्ट्रीयकरण करण्याचाही सरकारचा विचार आहे. अर्थात् कोणते धंदे राष्ट्राच्या मालकीचे करतां येण्यासारखे आहेत हें अद्याप ठरलेलें नाहीं. पण अशा प्रकारच्या कारखान्यांत वीज उत्पन्न करण्याचे कारखाने, मोटार-वहातूक, साखर, कापड-गिरण्या इत्यादींचा समावेश होतो. अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांवर व कारखान्यांवर खाजगी व्यक्तींचा मालकी हक्क असला म्हणजे ते व्यक्तिहिताच्या दृष्टीनेच केवळ चालविले जातात आणि सर्वसामान्य जनतेला त्यापासून फारसा फायदा होत नाहीं. या मुद्याचें स्पष्टीकरण करतांना श्री. पाटील यांनीं प्रांतांतील पाटबंधारे व धरणें यांचें उदाहरण घेतलें. धरणासारख्या मोठ्या योजना सरकार पैसे खर्चून तयार करतें पण त्याचा फायदा मात्र गूळवाले व साखरवाले ह्यांसारख्या कांहीं थोड्या व्यक्तींनाच मिळतो, असें श्री. पाटील यांनीं सांगितलें. हें उदाहरण तितकेसें बरोबर नाहीं. एकतर सरकारचा पैसा म्हणजे पर्यायाने जनतेचाच पैसा. तेव्हां त्या पैशांनी उभारलेल्या योजनेचा फायदा सर्वांना मिळाला पाहिजे हें तर्कशुद्ध आहे. पण खाजगी भांडवलाने चालणाऱ्या कारखान्यावर नियंत्रण ठेवणें हा अगदीं निराळा मुद्दा आहे. आणि या मुद्यावर मुंबई प्रांतांतही वाद माजण्याचा संभव आहे येवढें आम्ही नमूद करूं इच्छितों.

---

**तडजोडीमुळें कर्जांत घट**—गेल्या काँग्रेस मंत्रिमंडळानें मद्रास प्रांतासाठी ॲग्रि. रिलीफ ॲक्ट केला. एप्रिल, १९४६ अखेर त्या कायद्याखालील २,०५,२४७ अर्जांचा विचार करण्यांत येऊन कर्जाची रक्कम ५ कोटि रुपयांनी उतरविण्यांत आली. ही रक्कम मूळ कर्जाच्या ६१% होती.

**ठेवी घेण्याची शेड्यूल्ड बँकेस बंदी**—सोमवार ता. १७ पासून ठेवी घेण्यास बंदी करणारा हुकूम इंटरनॅशनल बँक ऑफ इंडिया लि. वर हिंदुस्थान सरकारने काढला आहे. रिझर्व्ह बँकेने वरील बँकेचे हिशेब तपासले व रिपोर्ट केला, त्याचा हा परिणाम आहे.

# स्फुट विचार

## पीक कर्जासाठीं धान्यडेपोंस उत्तेजन

बॉंबे ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्टान्वयें ज्याच्या कर्जाची तड-जोड झालेली आहे किंवा ज्याचें प्रकरण अद्याप चालू आहे, अशा शेतकऱ्यांना पीक कर्जें देण्यासाठीं धान्याचे डेपो स्थापन कर-ण्यास उत्तेजन देण्याचें मुंबई सरकारचें धोरण आहे. असे डेपो स्थापन करण्यासाठीं सरकार कर्ज देईल तें १० हप्त्यांत वसूल केलें जाईल व त्यावर व्याज ४% पडेल. धान्य डेपो दोन नमुन्यां-प्रमाणें चालवितां येतील (१) इगतपुरी व (२) ठाणें. इगत-पुरी नमुन्याचा डेपो सहकारी तत्त्वावर असून, त्याचें व्याज २५% इतकें आहे, तें धान्याचे स्वरूपांत द्यावयाचें असतें. त्यापैकीं एक तृतीयांश व्याज कर्जदाराच्या शेअरखातीं जमा केलें जातें. ठाणें नमुन्याच्या डेपोंतहि धान्याच्या स्वरूपांतच व्याज वसूल केलें जातें, त्याचा दर १६⅔% आहे. रोख रकमेनें व्याजाची वसुली धान्यडेपोच्या तत्त्वाशीं विसंगत आहे. प्रारंभीं सांगितल्या-प्रमाणें अशा डेपोच्या स्थापनेसाठीं सरकार कर्ज देणार आहे, त्यावर पहिलीं पांच वर्षें व्याज आकारण्यांत येणार नाहीं व मुद्-लहि मागण्यांत येणार नाहीं. धान्यडेपो चालविण्यांत नुकसान आलें तर तें चालकांना सोसावें लागेल.

## हुकूमनामे थोपवून धरण्याची सवलत

बॉंबे ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्टाप्रमाणें शेतकऱ्यांच्या कर्जासंबं-धींचीं प्रकरणें कर्ज तडजोड बोर्डाकडे वर्ग करावयाचीं असतात. सहा महिन्यांच्या ठरलेल्या अवधींत कर्जदार किंवा सावकार ह्यांपैकीं दोघांनींहि अर्ज केला नसल्यास, ३२ कलमाप्रमाणें कर्ज रद्द ठरलें जातें. ज्या कर्जदारावर हुकूमनामा झालेला आहे, तो वरील ॲक्टाखालीं कर्जदार ठरतच नाहीं किंवा त्याच्या कर्जाची एकूण रक्कम १५,००० रुपयांपेक्षा ज्यास्त आहे ह्या मुद्यावर साव-कार हुकूमनामा बजावण्यासाठीं अर्ज करणें शक्य आहे. अशा कारवाईस कर्जदारास तोंड देतां यावें, (विशेषतः कर्जदार किंवा सावकार ह्यांपैकीं कोणीहि अर्ज न केल्यामुळें कर्ज रद्द झालेलें असल्यामुळें) ह्याची कांहींतरी तरतूद करणें आवश्यक आहे. ह्यासाठीं, हायकोर्टानें सिव्हिल कोर्टांना योग्य त्या सूचना द्याव्या अशी त्यांस विनंती करण्यांत आली आहे. हुकूमनाम्यांची अंमल-बजावणी करण्यापूर्वी कर्जदारास तिला विरोध करण्यास संधी देण्यांत यावी, अशी सूचना मामलेदार व महालकरी ह्यांना कलेक्ट-रांनीं केली आहे. मामलेदार व महालकरी ह्यांना सिव्हिल कोर्टा-कडे हुकूमनाम्याचें प्रकरण परत धाडतां येईल. म्हणजे त्यांचा पुनः विचार होऊं शकेल.

## रिझर्व्ह बँकेचे भागीदार होण्यावर निर्बंध

दक्षिण आफ्रिकेच्या कोणत्याहि युरोपियन नागरिकास हिंदी रिझर्व्ह बँकेचे भागीदार असण्याचा अधिकार नाहीं, असें रिझर्व्ह बँकेनें आतां ठरविलें आहे. हिंदी व युरोपियन ह्यांचेमध्यें भेद मान-णारे कायदे त्या देशामध्यें अमलांत आहेत, आणि असे कायदे ज्या देशांत अंमलांत आहेत तेथील नागरिकांना रिझर्व्ह बँकेचे भागीदार होण्याची पात्रता नाहीं, असें रिझर्व्ह बँकेचा कायदा सांगतो. एखाद्या देशानें आपले स्वतःचे नागरिक व बाकीच्या इतर सर्व देशांचे नागरिक ह्यांत भेद मानणारा कायदा केला, तर रिझर्व्ह बँक त्याची दखल घेणार नाहीं. परंतु इतर देशांचे नागरिक व हिंदी नागरिक ह्यांचेमध्यें भेद करणारा कायदा अंमलांत असेल, तर रिझर्व्ह बँक कायद्याचें चवथें कलम सांगतें, कीं त्या देशाचे नाग-रिकांस बँकेचे भागीदार करून घेऊं नका. "ग्रेटब्रिटनचे नागरिकांना हिंदुस्थानांत ज्या सवलती मिळतात, तशाच हिंदी नागरिकांना ग्रेट ब्रिटनमध्यें मिळतात ह्या आधारावर ब्रिटिश नागरिकांना बँकेचे भागीदार होऊं देणें वेगळें आणि ज्या वसाहतींत हिंदी नागरिकांस कनिष्ठ दर्जानें वागविण्यांत येतें अशा वसाहतींच्या नागरिकांस हिंदुस्थानांत हिंदी नागरिकांच्या बरोबरीनें वागविणें वेगळें. ह्या तत्त्वास व्यावहारिक स्वरूप देण्यासाठीं आम्ही रिझर्व्ह बँकेच्या तिसऱ्या कलमांत दुरुस्ती सुचवित आहों." असें बिलावरील जॉइंट कमिटीनें आपल्या रिपोर्टांत म्हटलें होतें. जॉइंट कमिटीनें केलेल्या ह्या सुधारणेची आतां प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे.

## सुप्रीम म्यूच्युअल ॲ. कं. लि.

वरील कंपनीची वार्षिक सभा १९ जून रोजीं भरली होती, तिनें डायरेक्टरांचा चौथ्या वर्षाचा अहवाल, हिशेब, वगैरेंस मान्यता दिली. कंपनीने अहवालाचे वर्षीं १६ लक्ष, ६९ हजार रुपयांचें काम पुरें केलें आहे. म्हणजे, तिनें स्थापनेपासून आतांपर्यंत चार वर्षांत ५० लाखांचें काम मिळविलें आहे. खर्चाचें प्रमाण १४·७% वर उतरलें आहे. १९४५ मधील प्रत्येक पॉलिसीची सरासरी रक्कम २,०८६ रुपये भरली. एकूण हप्त्यांचें उत्पन्न १,२१,०२९ रुपये भरलें आणि व्यवस्थेचा खर्च भागून विमा खातीं फंडांत ५४ हजा-रांची भर पडली. खर्चाच्या प्रमाणांत वाढ होऊं न देतां धंद्यासाठीं नवीं क्षेत्रें व संघटना निर्माण करण्याचा व उत्पन्नाच्या बाबी वाढ-विण्याचा चालकांचा सतत प्रयत्न चालू आहे. पुणें, सोलापूर व माज-गांव येथील वसाहतींच्या योजना व शाखांचा विस्तार हें त्याचें द्योतक आहे. महाराष्ट्रीय म्यूच्युअल विमा कंपन्यांत सुप्रीम म्यूच्यु-अलनें बराच पुढाकार मिळविला आहे. तिचें पहिलें मूल्यमापन लवकरच होणार आहे, त्याचा निकाल समाधानकारक लागेल अशी खात्री कंपनीच्या अध्यक्षांनीं व्यक्त केली आहे. आम्ही श्री. म्हैसूर, एम्. ए., एलएल. बी., ह्यांच्या नेतृत्वाखालील "सुप्रीमला" सुयश चिंतितों.

## परत फेडावयाचे ३½% चे कर्जरोखे

हिंदुस्थान सरकारनें ३½% व्याजाचें आपलें बिनमुदती कर्ज फेडून टाकण्याचें ठरविलें आहे. ह्या कर्जाचा तपशील खालीं दिला आहे. त्यावरून, हीं कर्जें एकूण पांच वेळां काढण्यांत आलीं होतीं व त्यांपैकीं दोन कर्जें १८५७ सालापूर्वींचीं आहेत, हें लक्षांत येईल.

| | कर्जरोखा | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| ३½% | १८४२–४३ | ७२,०८,७६,००० |
| ३½% | १८५४–५५ | ३९,३३,८०,००० |
| ३½% | १८६५ | ६६,३९,७८,००० |
| ३½% | १८७९ | १७,८३,७४,००० |
| ३½% | १९००–१ | ७७,२४,४४,००० |

**हवाई वहातुकीचे दर उतरले**—इंग्लंड–हिंदुस्थान–ऑस्ट्रे-लिया या हवाई मार्गावरील उतारूंच्या व मालाच्या वहातुकीच्या दरांत सुमारें ५० टक्के कपात करण्यांत आली आहे. कराची ते लंडनच्या प्रवासाला आतां १५१ पौंडां ऐवजीं १२० पौंड पड-तील. कलकत्ता ते लंडनचा दर १६३ पौंडांवरून १४० पौंडांवर आणण्यांत आला आहे.

## शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी सहकारी योजना

### सुशिक्षित शहरी लोकांनीं लक्ष घालण्याचें अगत्य

“ बॉंबे ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्टाच्या अंमलबजावणीचा विस्तार करणें, तडजोड केलेलीं कर्जें सहकारी-लँड मॉर्गेज बँकांकडे वर्ग होणें सुलभ करणें, सहकारी संस्थांमार्फत पीक-कर्जाची व्यवस्था करणें, सहकारी पद्धतीने शेतीच्या मालाची विक्री घडवून आणणें, इत्यादि बाबी प्रांतिक सरकारच्या कार्यक्रमांत प्रामुख्याने आहेत. पतपेढ्यांमार्फत कर्जे देण्याची व्यवस्था होऊन दीर्घकाळ लोटला तरी अद्याप १०% शेतकऱ्यांचा सुद्धां पतपेढ्यांशीं संबंध आलेला नाहीं. पुरवठा व विक्री ह्यांचेशी भांडवलाची सांगड घातली म्हणजे शेतकऱ्यांची शेती सुधारण्यास चांगलें सहाय होणार आहे. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं सहकारी शेतीचे सरकारी मदतीने प्रयोग करण्यांत यावेत असें धोरण आहे. मुंबई प्रांतांतील परिस्थितीस अनुरूप अशी त्याची व्यावहारिक योजना आखण्याच्या दृष्टीने चौकशी चालू आहे.

“ हिंदुस्थान, चीन, ह्यासारख्या देशांत खेडेगांवीं जनतेचेंच प्राधान्य आहे. स्थानिक मालावर चालणाऱ्या व कामांत न गुंतलेल्या स्थानिक लोकांना मजुरी देणाऱ्या ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करून त्यांची वाढ करणें हेंच अशा परिस्थितींत युक्त आहे. सहकारी संघटनेचे द्वारा हें घडवून आणणें सर्वांत श्रेयस्कर होईल, ह्या दृष्टीनें सरकारचा प्रयत्न चालू आहे. ज्या प्रमाणांत सहकारी चळवळीस लोकांचा पाठिंबा मिळेल, त्या प्रमाणांत ती यशस्वी होईल. ह्या दृष्टीने शहरांतील सुशिक्षित लोकांनीं सहकारी चळवळींत लक्ष घातलें पाहिजे.”:—मुंबई प्रांताचे अर्थमंत्री, श्री. वैकुंठराय मेहता.

---

**शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड** —मुंबई ऋणविमोचन कायद्यान्वयें कर्जतडजोडीसाठी एकूण २,३५,९१६ कर्जाबाबत अर्ज आले,त्यांचा तपशील खालीं दिला आहे:—

| जिल्हा | कर्जाची संख्या | कर्जाची रक्कम ( रु. ) |
|---|---|---|
| अहमदाबाद | ४,४७५ | ४२,५५,१४५ |
| खेडा | ८,८१२ | ३९,१४,५९१ |
| भडोच—पंचमहाल | ९,८३९ | ६३,१८,४४३ |
| सुरत | ६,४१६ | ४६,४९,७३९ |
| ठाणें | ३,०४१ | १७,६८,७८७ |
| अहमदनगर | २७,३२१ | १,२०,०३,८२५ |
| पूर्वखानदेश | २१,६५६ | १,९१,४८,९३५ |
| पश्चिमखानदेश | ४,१२८ | ४२,२१,७२५ |
| नाशिक | १३,५११ | ८६,१९,६२२ |
| पुणें | ८,९७८ | २५,७१,०५० |
| सोलापूर | ७,०५२ | ५२,५०,६०३ |
| सातारा | ३६,५१३ | १,८१,९९,३८३ |
| बेळगांव | ३६,३३१ | २,७९,२०,३४३ |
| विजापूर | १०,७९६ | ८१,१८,२३६ |
| धारवाड | ७,४४७ | ५२,१२,७२० |
| कानडा | १,४०६ | ७,७३,३६२ |
| कुलाबा | ८,७४१ | ६२,२६,२२४ |
| रत्नागिरी | १९,५९९ | ९५,७१,३६२ |

---

## विविध माहिती

**कपाशीच्या खरेदीसाठी कर्ज**—अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें झेकोस्लोव्हेकिया देशास कपाशीच्या खरेदीसाठी २ कोटि डॉलर कर्ज देण्याचें ठरविलें आहे. ह्या किंमतीस १,३०,००० गाठी अमेरिकन कपास झेकोस्लोव्हेकियास मिळूं शकेल. कर्जावर २½% व्याज आकारलें जाईल.

**मोटारींचे नवे कारखाने**—मोटारींच्या उत्पादनासाठी अमेरिकेंत २५ नवे कारखाने उभारण्यांत येत आहेत.

**शिलक तीनपैसेवाल्या तिकिटांचे पैसे परत मिळणार**—१ जुलैपासून दोन पैसेवालीं कार्डें मिळूं लागतील. न वापरलेलीं ३ पैसेवालीं कार्डें घेऊन त्यांचे बद्दली २ पैसेवालीं कार्डें पोष्ट ऑफिसांत देण्यांत येतील. ३० सप्टेंबर अखेरच ही सवलत चालू राहील. ३ पैसेवाल्या कोऱ्या कार्डावर कांहीं मजकूर छापण्यांत आलेला असेल तर कार्डाच्या किंमतीच्या ८०% रकम दिली जाईल. अशा कार्डांचे पैसे मिळण्याकरितां पोष्ट मास्टर जनरलकडे अर्ज करावेत.

**साखर कारखान्यांची सोय**—येत्या दोन वर्षांत नवीन रस्ते बांधणें व जुने दुरुस्त करणें यासाठी संयुक्त—प्रांत सरकार २० कोटी रुपये खर्च करणार आहे. साखर कारखान्यांच्या भागांत ५०० मैल लांबीचे सीमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधण्यांत यावयाचे आहेत.

**भाडें नियंत्रण**—बंगाल सरकार भाडें–नियंत्रण करण्यासाठी एक कायदा करणार असून त्या अन्वयें सध्याची भाडें नियंत्रण ऑर्डर आणखी ३ वर्षें चालू राहील. या ऑर्डरची मुदत ता. ३० सप्टेंबर १९४६ रोजीं संपत आहे.

**दारूगोळ्यापेवजीं नैट्रोजन खतें** —अमेरिकेंतील दारूगोळ्याच्या १५ कारखान्यांचें दारूगोळ्याचें उत्पादन थांबवून त्यांत अमोनियम सल्फेट तयार करण्यांत यावयाचें आहे. दुष्काळग्रस्त देशांकडे हें खत पाठविण्यांत येईल.

**दीड कोटीची ऑर्डर** —डीझेल इंजनांचे खडी चेपण्याचे रूळ हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमधून मागवले आहेत. एकूण ऑर्डर सुमारें दीड कोटि रुपयांची आहे.

**वधू अमेरिकेस गेल्या, परंतु त्या भार्या होणार का ?**—युद्धसमाप्तीपासून आतांपर्यंत सुमारें ६,००० अँग्लो-इंडियन वधू अमेरिकेकडे रवाना झाल्या आहेत. त्यांचे अमेरिकन सैनिकांबरोबर विवाह होणें अगदी सोपें नाहीं. वधूच्या रक्तांत ५१% हिस्सा श्वेतवर्णीयाचा पाहिजे, लष्करी गुरुजींची संमति पाहिजे, लष्करी डॉक्टरानें समाधानकारक वैद्यकीय रिपोर्ट केला पाहिजे आणि लष्करी अधिकाऱ्यांची विवाहास शिफारस पाहिजे.

**बँक नोकरांचा ३० मिनिटें संप**:—मुंबईमधील बँकांतील नोकर शुक्रवार ता. २८ जून रोजीं अर्धा तास (११ ते ११–३०) संप करणार आहेत. ऑल बँक्स एम्प्लॉईज फेडरेशनच्या मागण्यांस पाठिंबा दर्शविणें, हा त्याचा उद्देश आहे. २३ प्रमुख बँकांस हा संप बाधक होईल. ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनची मागणी खालीलप्रमाणें आहे. बँकेच्या नोकरास हिं. सरकारच्या नियमांप्रमाणें हक्काची व कॅज्युअल रजा; कारकुनांस व शिपाई वर्गास किमान अनुक्रमें सुरवातीचा ७५ रु. व ४० रु. पगार, योग्य महागाईभत्ता, अनुक्रमें १० व ५ रु. वार्षिक पगारवाढ, कामाचे कमाल तास ( १ तास सुट्टी धरून ) सात, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी व/अथवा पेन्शन, नोकरीची शाश्वती इ.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचें भांडवल

### सहकारी संस्थांस वांटा पाहिजे

लेः—श्री. जी. ए. भोंसुले, बी. कॉम- मॅनेजर, प्रांतिक सहकारी बँक, नागपूर

पांच कोटि रुपये भांडवलाची " ऑल इंडिया इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन " स्थापन करण्यांत येणार आहे, असें " अर्था " मध्यें वाचलें. दीर्घकाळ मुदतीचीं मोठ्या उद्योगधंद्यांस कर्जे देणें हेंच कॉर्पोरेशनचें काम राहील, हें उघड आहे. तिचें भाग भांडवल खालीलप्रमाणें विभागण्यांत येईलः—

| | |
|---|---|
| ( १ ) सरकार | २ कोटि रु. |
| ( २ ) शेड्यूल्ड बँका | २ कोटि रु. |
| ( ३ ) विमा कंपन्या, ट्रस्ट कंपन्या, इ. | १ कोटि रु. |
| | एकूण ५ कोटि रु. |

शेड्यूल्ड बँकांना त्यांचेकडील ठेवींचे प्रमाणांत भाग दिले जातील. ब्रिटिश एक्सचेंज बँकांसही भाग मिळणार आहेत.

वरील आंकड्यांवरून दिसून येईल कीं, सहकारी बँकांना कांहींच भाग मिळणार नाहींत. प्रस्तुत कॉर्पोरेशनचें स्वरूप अस्सल भारतीय स्वरूपाचें आहे. सहकारी बँका शेती आणि ग्रामोद्योग ह्यांस मोठ्या प्रमाणावर भांडवल पुरवून हिंदी आर्थिक संसारांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेणार आहेत. अशा परिस्थितींत, वरील कॉर्पोरेशनच्या भांडवलापैकीं किमान २५ लक्ष रुपये तरी सहकारी बँकांसाठीं राखून ठेवण्यांत येणें आवश्यक आहे. प्रांतिक सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँका ह्यांचेजवळ सुटा पैसा मुबलक पडून आहे. तेव्हां त्यांना २५ लक्ष रुपयांचे भाग घेण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं. ह्या शेअर्सवरील डिव्हिडंडची हमी सरकार घेणार असल्याकारणानें ते " गिल्ट एज्ड " समजले जातील.

कॉर्पोरेशनची स्थापना निश्चित होणार तेव्हां त्याचे भाग मिळविण्याची जोराची खटपट आपण केली पाहिजे. वास्तविक, ४० कोटि लोकसंख्येच्या हिंदुस्थानाचे मानानें नियोजित भांडवल फार अल्प आहे. तें २५ कोटि रुपये तरी पाहिजे. म्हणजे ५०० रुपये देऊं शकणाऱ्या व्यक्ती, धर्मादाय संस्था इत्यादींसहि भांडवल उभारणींत भाग घेतां येईल. नियोजित कॉर्पोरेशनचें कांहीं भांडवल सहकारी संस्थांस मिळालें पाहिजे. इतकेंच नव्हे तर कॉर्पोरेशनच्या डायरेक्टर बोर्डावरही त्यांस प्रतिनिधित्व मिळणें जरूर आहे.

### कर्जनिवारण कायदा

मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायदा अहमदनगर जिल्ह्यांतील अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, संगमनेर, अकोला, नेवासा, शेवगांव व पाथर्डी अशा नऊ तालुक्यांस लागू करण्यांत आला आहे. सदरहू तालुक्यांतील ज्या कर्जदारांनीं कर्जनिवारण बोर्डांकडे अर्ज केले असतील अगर ज्यांचेवर निवाडे झाले असतील अशा कर्जदार-अर्जदारांना सवलतीच्या व्याजाच्या दरानें पीक उभारणेकरितां कर्ज द्यावें असें ठरविण्यांत आलें आहे. ज्या अर्जदारांना पिकें उभारणेकरितां कर्ज पाहिजे असेल त्यांनीं सहकारी सोसायटींचे सभासद झालें पाहिजे. जर त्यांचे गांवीं सोसायटी नसेल व तें गांव इतर संस्थांकडे कर्ज पुरविणेकरितां सोंपविलें असेल तर त्या दुसऱ्या संस्थांचे सभासद झालें पाहिजे. सोसायटीचे अगर इतर संस्थांचे सभासद झाल्यानंतर त्यांस पीक उभारणेकरितां लागणारें कर्ज त्या संस्थेकडून मिळेल. नगर जिल्ह्यांतील वरील नऊ तालुक्यांत सहकारी सोसायट्या, मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि. मुंबई, शेवगांव नेवासा ता. सहकारी खरेदीविक्री संघ लि. शेवगांव; पाथर्डी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, लि. पाथर्डी, कर्जत तालुक्यांतील मौजे केमळी येथील एक सावकार व सरकार इतक्या संस्थांमार्फत कर्ज मिळण्याची सोय करण्यांत आलेली आहे. कोणकोणतीं गांवें कोणकोणत्या संस्थांकडे सोंपविलीं आहेत याविषयीं गांववार तपशीलवार यादी प्रत्येक तालुक्याचे कचेरींत पाहावयास मिळेल. तसेंच मे. असिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर पारनेर, श्रीगोंदा-संगमनेर व नेवासा यांचे ऑफिसांतही पहावयास मिळेल. आतां शेतीचा हंगाम जवळ आला आहे तरी गरजू अर्जदारांनीं वेळेवर आपआपली सोय लावून घ्यावी. याशिवाय ज्या कोणाला जादा माहितीची अपेक्षा असेल त्यानें वरील चार ॲ. असि. डि. को. ऑफिसर यांचेकडे अगर खालीं सही करणार यांचेकडे चौकशी करावी. **एम. आर. जाधव**, सब—ऑडिटर, डेट रिलीफ, अहमदनगर.

## सहकारी कार्यकर्त्यांचा सन्मान

### श्री. ग. रा. साने, वकील, बार्शी

बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., या बँकेचे गेलीं सतत वीस वर्षें चेअरमन म्हणून काम करीत असलेले श्री. गणेश रामचंद्र साने, वकील बार्शी, ह्यांच्या वयास ६० वर्षें पूर्ण झाल्याबद्दल बँकेच्या वतीनें रविवार दिनांक ९ जून १९४६ इ. दिवशीं सायंकाळीं ५॥ वाजता बँकेच्या साने मेमोरिअल हॉलमध्यें सत्कार करण्यांत आला, त्यावेळीं सुमारें १५० सभासद व सोसायटी प्रतिनिधी हजर होते. प्रथम व्हाइस चेअरमन श्री. बाबाराव काळे यांनीं हा समारंभ उशिरां कां होत आहे, त्याचीं कारणें सांगितल्यावर श्री. गुर्जर (सेवानिवृत्त शिक्षक), श्री. जोशी वकील, श्री. घाटे वकील, श्री. उटगीकर वकील, श्री. कुलकर्णी ( वैराग ऑईल मिलचे मॅ. एजंट) वगैरेचीं श्री. साने यांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. त्यांनीं श्री. साने ह्यांच्या ठिकाणीं सहजीं प्रत्ययास येणारा सरळपणा, कामाची चिकाटी, सार्वजनिक कामामध्यें असतांना स्वार्थपराङ्मुखता, मनमिळाऊपणा व मनावरील ताबा इत्यादि गुणांची श्रोत्यांस माहिती करून दिली.

श्री. काळे यांनीं नामदार अर्थमंत्री वैकुंठराय मेहता व सोलापूर विभागाचे ॲसिस्टंट रजिस्ट्रार साहेब यांचे संदेश वाचून दाखविले, व बँकेतर्फे एक चांदीचा नक्षीदार ट्रे श्री. साने यांस अर्पण केला व हारगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यांत आल्यावर श्री. साने यांचें समयोचित आभारप्रदर्शक भाषण झालें. त्यामध्यें श्री. साने यांनीं आपल्या भाषणांत इतर वक्त्यांनीं केलेल्या स्तुतीबद्दल विनयानें असा उल्लेख केला कीं, सज्जनांना दुसऱ्याचे बारीकसारीक गुणहि मोठे दिसतात. ही बँक गेलीं ४० वर्षें सतत अग्रगांमध्यें आहे, त्याचें श्रेय माझें एकट्याचें नसून संपूर्ण एकोप्यानें काम करणारें डायरेक्टर मंडळ व त्यांना निवडून देणारे मेंबर्स या सर्वांनाच आहे; हें परस्पर सहकार्य असेंच वृद्धिंगत होवो असें सांगून आपलें भाषण संपविलें. शेवटीं सर्वांस चहा व पानसुपारी दिल्यावर हा गोड कार्यक्रम संपला.

## अवंदखेड ग्रुप को-ऑपरेटिव्ह थ्रीफ्ट अँड क्रेडिट सोसायटी अनलिमिटेड तालुका दिंडोरी जि. नाशिक

सदर सोसायटीची पहिली साधारण सभा मे. डॉक्टर एम. एन. देसाई असिस्टंट रजिस्ट्रार साहेब को. सो. धुळें विभाग यांचे अध्यक्षतेखालीं ता. २३-५-४६ रोजीं अवंदखेड येथें दुपारीं ३ वाजतां भरली होती. सदर प्रसंगीं मे. काळकर लँड व्हॅल्युएशन ऑफिसर सो दिंडोरी, मे. टिल्लू असिस्टंट डि. को. ऑफिसरसाहेब दिंडोरी, तसेंच मि. ठोके मॅनेजर सेल परचेस युनियन दिंडोरी इत्यादि अधिकारीवर्ग व गांवांतील सद्गृहस्थही हजर होते.

मे. टिल्लूसाहेब यांनीं सोसायटीच्या व्यवहाराबाबत व क्रॉप फायनान्सबाबत भाषण केलें. समारोप करतांना मे. अध्यक्ष डॉक्टर देसाई साहेब यांनीं सभासदांना सोसायटी आदर्श होणेबाबत कळकळीचें भाषण करून आभारप्रदर्शन झाल्यावर सभेचें काम संपविलें.

**पौंडी शिलकांचा प्रश्न**—हिंदुस्थानच्या इंग्लंडकडे येणें असलेल्या पौंडी शिलकेबद्दल वाटाघाटी करण्याचा अधिकार हिंदुस्थानला गेलेल्या ब्रिटिश शिष्ट-मंडळाला नाहीं असें इंग्लंडचे फडणीस डॉ. डाल्टन यांनीं पार्लमेंटमध्यें सांगितलें.

**मुंबई विश्वविद्यालयाचें बजेट** —मुंबई विश्वविद्यालयाचें १९४६-४७चें अंदाजपत्रक २७½लक्ष रुपयांचें आहे.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा

सिंप्लेक्स रु. ९ दि. ४–७–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १८।६।४६ | बुधवार १९।६।४६ | गुरु, शुक्रवार २०,२१।६।४६ | शनिवार २२।६।४६ | सोमवार २४।६।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | ३२०५—० | ३१७८–१२ | —बाजार बंद होता— | ३२१२—८ | ३२४५—० |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५६९—८ | ५६२—८ | | ५६६—८ | ५७१—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २६१५—० | २५७५—० | | २५७७—८ | २६०५—० |
| ७०२; ५६६ | १९——०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ९७७—० | ९५९—० | | ९५७—० | ९६१—० |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ८७०—० | ८५७—० | | ८५२—० | ८६२—० |
| ४४३–८; ३६० | ५–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४८०—० | ४७२—० | | ४६९—० | ४७०—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ४७१—० | ४६५—० | | ४६३—० | ४६५—० |
| ३३५; २८३-८ | ८–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ४०६—० | ३९६—० | | ३९४—० | ३९५—० |
| ३३७; २४३ | ९–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४४९—८ | ४४१—८ | | ४४२—० | ४४४—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५–१०–६ | ५–९–६ | | ५–८–६ | ५–८–० |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२–१२ | २२—५ | | २२—५ | २२–४–६ |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | „ डिफर्डस् | १ | ४—९ | ४—७ | | ४—८ | ४–७–६ |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | १००५—० | ९९०—० | | ९९७—८ | ९९७—८ |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २६६—० | २६५—० | | २६५—० | २६३—४ |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३४३—० | ३४१—० | | ३४४—० | ३४१—० |
| ५९२-८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ८१२—८ | ८०७—८ | | ८१७—८ | ८१७—८ |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ६०—० | ५९—९ | | ५९—० | ६०—० |
| | | | ३½% रोखे | १०० | १०४—२ | १०४—३ | | १०४—८ | १०४–१२ |

सोमवार दि. २४–६–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१—४ | बरोडा | २१५—० | आंध्रा व्हॅली | १९८०—० | अलकॉक | ६७६—४ |
| १९५१–५४ | १०३—६ | सेंट्रल | १४५—० | बॉम्बे ट्रॅम | १७०—० | बॉंबे स्टीम | ८५७—८ |
| १९५७ | १०४—१ | इंडिया | २७०—० | टाटा हायड्रो | २३५–० | न्यू इंडिया | १२५—० |
| १९५९–६१ | १०४—१ | इंपी० { | ३०८०—० | टाटा पॉवर | २१०५–० | शिवराजपुर | ५९—८ |
| १९६३–६५ | १०४—७ | | ७९०—० | | | टाटा केमिकल | २६–१२ |
| १९६६–६८ | १०४—७ | रिझर्व्ह | १७१—० | | | टाटा ऑईल | १३२—० |
| १९७०–७५ | १०४–१५ | युनियन | १९–१३ | | | | |
















# बिनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.

१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—


मायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

—— इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत ——



## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७७३८



डोके दुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज



## रामतीर्थ ब्राह्मी तेल

[स्पेशल नं.१]

पांढरे केस काळे होतात, स्मरण शक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.

१ पौं. बाटली रु. ३-८-०

८ औं. बाटली रु. २-०-०

(ट. ख. निराळा.)

प्रत्येक दुकानदाराकडे मिळते.

श्री रामतीर्थ योगाश्रम

४४८, सॅन्डहर्स्ट रोड, मुंबई ४.

VBC

मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.



महाराष्ट्र शारदेची तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

## पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील। किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ।

मेसर्स—विपट आणि मंडळी,

पो० कराड, जि. सातारा.



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००

काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००

भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००

खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड ,, | २५ मालेगांव ,, |
| ३ किर्लोस्करवाडी ,, | २६ नांदगांव ,, |
| ४ कोरेगांव ,, | २७ घोटी ,, |
| ५ इस्लामपूर ,, | २८ सटाणा ,, |
| ६ शिराळें ,, | २९ येवलें ,, |
| ७ तासगांव ,, | ३० मनमाड |
| ८ वाई ,, | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद ,, | ३२ दोंडाईचें ,, |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार ,, |
| ११ कल्याण ,, | ३४ साक्री ,, |
| १२ पालघर ,, | ३५ शहादें ,, |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर ,, |
| १४ अहमदनगर ( ,, अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें ,, |
| १५ बेलापूर रोड ,, | ३८ तळोदें ,, |
| १६ कोपरगांव ,, | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी ,, | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी ,, | ४१ गोध्रा ,, |
| १९ शेवगांव ,, | ४२ झालोद ,, |
| २० वांबोरी ,, | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गांव) ,, | ४४ नाडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद ,, |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड ,, |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,

मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.